# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/09/2023 (शुक्रवार) सकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. सावनेर :– अतर्गत ०६ कि. मी अंतरावरील सोनपूर ते अदासा मंदीर जवळ शासकीय रोप वाटीका जवळ दिनांक २८/०९/२०२३ चे १४.०० वा. ते १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अतुल वामनराव गायकवाड, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ सोनपूर पोस्ट आदासा ता. कळमेश्वर पो.स्टे सावनेर यांचा मोठा भाऊ **मृतक नामे – अमोल वामनराव गायकवाड, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ सोनपुर (आदासा)** याला आरोपी नामे– १) अंकीत अरूण कडु, २) प्रवीन रमेश उईके आणि ३) प्रभाकर मधुकर कोहळे तिन्ही रा. सोनपूर आदासा सावनेर यांनी दारू पिण्याकरीता पैसे मागीतल्याचे कारणावरून फिर्यादीच्या भावा सोबत भांडण करून, मारहाण केली तसेच फिर्यादीचे भावाचे सांगण्यावरून फिर्यादी त्यांना समजाविण्यासाठी गेला असता, वर नमुद आरोपीतांनी फिर्यादीला हातबुक्कीने व काठीने पाठीवर आणि डोक्यावर मारून जखमी केले तसेच फिर्यादीचे भावाला हातबुक्कीने, लाकडी काठीने व दगडाने मारून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार मारले आहे. त्याच प्रमाणे आरोपीतांनी फिर्यादीची मोटरसायकल घेवुन तेथुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे सावनेर येथे आरोपीतांविरुद्ध कलम ३०२, ३२४, ५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शरद भस्मे मो. नं. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. काटोल :– अतर्गत १० कि. मी अंतरावरील ढवळापुर हेटी येथे दिनांक २८/०९/२०२३ चे १४.३० वा. ते १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– संजय शामराव खंडाते, वय ४८ वर्ष, रा. ढवळापुरा काटोल हा त्यांचे घराचे अंगणामध्ये बसला होता त्याचे घरासमोरील लाकडी बेंचवर फिर्यादीची आई नामे –सरस्वतीबाई शामराव खंडाते, वय ७५ वर्ष ही बसली होती व तिच्या बाजुला फिर्यादीच्या शेजारी राहणारी सरस्वता शेषराव वलके ही बसली होती फिर्यादीच्या मोहल्ल्यामध्ये राहणारा यातील **आरोपी नामे –वासुदेव बाळकृष्ण पंधराम, वय ६० वर्ष** हा तेथुन जात होता त्यावेळी सरस्वता शेषराव वळके हिच्या घरचा कुत्रा त्याचेवर भुंकत होता यावरून आरोपीने तु तुझा कुत्रा सांभाळुन का ठेवत नाही असे म्हणुन तिच्या गालावर एक थापड मारली म्हणुन फिर्यादीची आई ही आरोपीस म्हणाली कि, ''का बंर तु झगडा भांडन करीत आहे'' असे म्हटले असता आरोपीने तु का मधात बोलली थांब तुला जिवानीशी ठार करतो असे म्हणुन तिच्या घरामधुन कुऱ्हाड घेवुन आला फिर्यादीच्या आईच्या डोक्यावर मारली त्यामुळे फिर्यादीची आई नामे सास्वतीबाई शामराव खंडाते ही जखमी झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे काटोल येथे आरोपीविरुद्ध कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पुनम कोरडे पोस्टे काटोल मो. नं. ७२७६३३०४५५ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर